नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०५/२०२६ (शनिवार )**

---

# परवान्यापेक्षा जास्त रेतीची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूध्द ५ गुन्हे नोंद
# १० वाहनासह ९४ ब्रास रेती असा एकुण ३ कोटी ४ लाख १० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात दिनांक १४/०५/२०२६ आणि दिनांक १५/०५/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना अवैधरित्या रेती चोरी बाबतच्या मिळालेल्या गोपनिय माहीतीवरून परवान्यापेक्षा जास्त रेती वाहतुक करून शासनाचा महसुल बुडवुण अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या १० वाहनांवर कारवाई करण्यात आली. १० वाहनांसह ९४ ब्रास रेती असा मुद्देमाल जप्त करून एकुण ५ गुन्हे नोंद केले.

**दिनांक १४/०५/२०२६** मौजा तारणा येथे परवान्यापेक्षा जास्त रेती वाहतुक करणारे वाहन क्रं १) टीप्पर क्रं एम.एच ४० डी.सी ९६९७ वर कारवाई करत वाहन आणि १० ब्रास रेती असा मुद्देमाल जप्त केला. तसेच **दिनांक १५/०५/२०२६** रोजी बायपास चौक उमरेड येथे नाकाबंदी करीत असताना भिवापुर कडुन उमरेड कडे येणारे वाहन क्रं २) टिप्पर एम.एच.२७ डि.पी. ७११४ सदर वाहनामध्ये १२ ब्रास रेती, वाहन क्रं ३) टिप्पर क. एम.एचं. ४० सि.टी. २१२१ मध्ये ९ ब्रास रेती, वाहन क्रं ४) टिप्पर क. एम. एच. ४० डि.सी.४३०१ मध्ये ९ ब्रास रेती, वाहन क्रं ५) टिप्पर क्रं एम.एच.४० डि.सी २४७९ मध्ये ०९ ब्रास रेती वाहन क्रं ६) टिप्पर क्रं एम.एच.४० डि.सी.७३८९ मध्ये ०९ ब्रास रेती, वाहन

क्रं ७) टिप्पर क्रं  एम.एच ४० बि.एल. ७२७० मध्ये १० ब्रास रेती वाहन क्रं ८) टिप्पर क्रं एम.एच.४०सि.टी ५२४२ मध्ये ०९ ब्रास रेती, वाहन क्रं ९) टिप्पर क्रं एम.एच. ४० सि.यु. ७२३५ मध्ये ०९ ब्रास रेती वाहन क्रं १०) टिप्पर क्रं एम.एच.४० डि.सी.४३५८ मध्ये ०८ ब्रास रेती सर्व रेती वाहन चालक/मालक यांच्यावर कारवाई करण्यात आली. सर्व वाहनांमध्ये परवान्यापेक्षा जास्त रेती असल्याचे आढळुन आले.

**नमुद वाहन क्रं १ चा आरोपी चालक** विकास अरूण वैदय, वय ३२ वर्ष, रा. मांगली, **वाहन क्रं २ चा आरोपी चालक** विशाल पुशु परतेती, वय ३२ वर्ष, रा. मोझरी, ता. जि अमरावती , **वाहन क्रं ३ चा आरोपी चालक/मालक** हेमंत मोरेश्वर येसमकर, वय ३७ वर्ष, रा. बालाजी नगर, मानेवाडा रोड, नागपुर , **वाहन क्रं ४ चा आरोपी चालक/मालक** बशिर इदु खान, वय ४२ वर्ष, रा. कामठी ता. नागपुर, **वाहन क्रं ५ चा आरोपी चालक** गंगाधर हरीभाउ मेंढे, वय ४५ वर्ष, रा. बाहदुरा फाटा, नागपुर, **वाहन क्रं ६ चा आरोपी चालक** राहुल कृष्णा सहारे, वय ३५ वर्ष, रा. उटी, ता. उमरेड जि नागपुर, **वाहन क्रं ७ चा आरोपी चालक** मुज्जफिर मुज्जमिल खान, वय २४ वर्ष, रा. भातकुली जि अमरावती , **वाहन क्रं ८ चा आरोपी चालक** अनिलकुमार मुन्नालाल सनोडिया, वय ३० वर्ष, रा. बीडगाव, जि नागपुर, **वाहन क्रं ९ चा आरोपी चालक** लियाकत अन्सारी वय ३२ वर्ष, रा. खरबी, नागपुर **वाहन क्रं १० चा आरोपी चालक** सुरज पृथ्वीराज निरगुडे, वय २५ वर्ष, रा. पाहणी, ता. नागभीड,जि चंद्रपुर आणि मालक आरोपी नामे  सचिन सुनिल बोकडे  वय ३४ वर्ष, रा. चिचाळा ता. भिवापुर जि नागपुर **यांच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अधिनियम** सहकलम ४८(७), (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधिनियम व सहकलम १५ पर्यावरण अधी सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम, १३०/१७७ मोटार वाहन कायदया**न्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. वर नमुद ११ आरोपींविरूध्द  एकुण ५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

**सदर कारवाईत वर नमुद १० वाहने आणि ९४ ब्रास रेती असा एकुण ३ कोटी ४ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# २ ट्रक आणि पोकलॅंड सह ९० लाख ७५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# वाहन सोडुन पळुन गेलल्या आरोपींचा तत्काळ घेतला शोध
# २ आरोपी अटक
# कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १५/०५/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा सिंगारदिप गावाजवळील कन्हान नदीच्या पात्रातुन अवैधरित्या पोकलॅंडद्वारे रेतीचे उत्खनन करून ट्रक मध्ये भरून रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे कन्हान पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन पाहणी केली. घटनास्थळी नदीपात्रात वाहन क्रं १) १० चक्का ट्रक क्र. एम. एच ४० बी एल ६९९४ आणि वाहन क्रं २) १० चक्का ट्रक क्र. एम. एच ४० बी एल ११११२ मिळुन आले . तसेच नदी किनाऱ्याजवळ झाडा झुडपात लपविण्यात आलेला KOMATSU कंपनीचा मोठा पोकलॅन्डचा मॉडल क्रं PC210 8MO असलेला मिळुन आले. वाहनांची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष १) १० चक्का ट्रक क्र. एम. एच ४० बी एल ६९९४ किंमती २५,००,०००/— रूपये, २) १० चक्का ट्रक क्र. एम. एच ४० बी एल ११११२ किंमती २५,००,०००/— रूपये, ३) KOMATSU कंपनीचा पोकलॅन्डचा किंमती ४०,००,०००/— रूपये, आणि ३) उपसा केलेली रेती किंमती ७५,०००/—रूपये असा **एकुण ९०,७५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** नमुद दोन्ही वाहनाचे चालक आणि मालक तसेच पोकलॅंड चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ३०३(२), ३(५), ४९ भा.न्या.सं, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद वाहनाचे चालक वाहन सोडुन पळुन गेले होते. मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक,

नागपुर ग्रामीण आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात कन्हान पोलीसांनी तात्काळ आरोपींचा शोध घेत सदर गुन्हयातील **वाहन क्रं १) चा मालक आरोपी नामे दुर्योधन चैनलाल पटले, वय ३० वर्षे, रा. डोंगरला ता तुमसर जि भंडारा ,वाहन क्रं २) चा मालक नितीन मंगलदास पटले, वय २७ वर्षे, रा. डोंगरला ता. तुमसर जि भंडारा, तसेच वाहन क्रं १) चा चालक मयुर अरूण नेरकर, वय २५ वर्षे, रा. रा.डोंगरला ता. तुमसर, जि भंडारा आणि तसेच वाहन क्रं २) चा चालक महेंद्र लालचंद नागोशे, वय ३२ वर्षे, रा. रा.डोंगरला ता. तुमसर जि भंडारा यांना तात्काळा शोधुन ताब्यात घेतले. दोन्ही वाहन मालकांना अटक करण्यात आली आहे.**

## पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) च्या गुन्हयातील गोवंश जनावराची कत्तलीकरीता तस्करी/वाहतुक करणाऱ्या टोळीतील पाहीजे आरोपीला अटक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकामी तस्करी करणाऱ्या **टोळीचा प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण १२ आरोपीतांच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.** सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे १) नामे मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी, वय ४० वर्षे, रा. महेंद्र नगर, बुर्ज खलीफा हॉटेल जवळ, टेका नाका, नागपुर आणि ११ सदस्य यांच्यावर ३२६(ग), ६१(२), भा.न्या.सं ५(१),(अ) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम , ११(१) (ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १३४/१७७ मोटर वाहन अधिनियम, ८ (ब) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, ३ (१) सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम , कलम ७ फौजदारी सुधारणा कायदा सह कलम ३ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयात पोलीसांनी १) टोळी प्रमुख नामे मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी, वय ४० वर्षे, रा. महेंद्र नगर, बुर्ज खलीफा हॉटेल जवळ, टेका नाका, नागपुर हा असुन टोळी सदस्य २) सैयद सुल्तान उर्फ सोनु हमीद अली वय ३३ वर्षे रा. महेंद्र नगर, पाण्याचे

टाकी जवळ, आजरी —माजरी यशोधरा नगर, नागपुर, आरोपी क्रं ३) आमीर रउफ कुरेशी, वय २९ वर्षे, रा. महेंद्र नगर पाण्याची टाकी, पाचपावली नागपुर आणि ४) रफीक कुरेशी शेख सत्तार कुरेशी, वय ३२ वर्षे, रा. टेका नाका, पाण्याचे टाकीजवळ, नागपुर, ५) शोहेब नौशाद सैयद वय २६ वर्षे रा. बुरड मोहला,लाखनी जि.भंडारा, ६) मनोहर भोजराज मनगटे वय २६ वर्षे रा. पानगाव पो.स्ट सालेकसा, आरोपी क्रं ७) इख्तियार कुरेशी मुश्ताक कुरेशी, वय ३३ वर्षे, रा. प्रवेश नगर, यशोधरा नगर **यांना यापुर्वी अटक केलेले आहे.**

**दिनांक १५/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयात पाहीजे आरोपी नामे राकेश रामराव सेलोकर, वय २२ वर्षे, रा गोपीवाडा, शहापुर ता.जि. भंडारा याला मौदा, बस स्थानकाजवळुन ताब्यात घेवुन अटक केले आहे. नमुद आरोपी दिनांक २०/०५/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर करण्यात आला आहे.**



**आरोपी राकेश रामराव सेलोकर**

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या अज्ञात आरोपींचा तात्काळ घेतला शोध ३ आरोपी अटक, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद :—** दिनांक १५/०५/२०२६ रोजी फिर्यादी राहूल गौतम डहाट, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र ०५, केळवद, ता. सावनेर, जि. नागपूर यांनी पोलीस स्टेशन केळवद येथे तक्रार दिली की, दिनांक १५/०५/२०२६ रोजी १६/३० वा. चे दरम्यान सावनेर कडून एक सुझुकी अँक्सिस दुचाकी वाहन क्र. एम एच ४९/सी यु ८०४४ ही आली व त्यावर तिन अनोळखी इसम हे मौजा परसोडी शिवार येथील भारत पेट्रोल पंप वर आले व आपसात एकमेकांना शिवीगाळ करत होते. पेट्रोलपंपावर काम करणारा रवि बांगडे याने त्यांना शिवीगाळ करून नका असे हटकले असता या कारणा वरून त्या तिन्ही अनोळखी इसमा पैकी एकाने रविंद्र उर्फ रवि सुरेश बांगडे, वय २८ वर्षे, रा. केळवद यास जिवाने मारण्याचे उदेदशाने चाकु मारून त्याला गंभीर जखमी केले.त्यानंतर आरोपी पळुन गेले. **सदर घटनेची माहीती केळवद पोलीसांना प्राप्त होताच त्यांनी तात्काळ आरोपींचा शोध घेणे कामी शोध मोहीम राबविली. पोलीसांनी ठिकठिकाणी नाकाबंदी लावली तसेच पेट्रोलींग केली असता पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान नमुद वर्णनाचे आरोपी हे छिंदवाडा ते नागपुर बायपास रोड वरील पुलाच्या खाली मिळुन आले.पोलीसांनी अवघ्या एका तासाच्या आत वरील गंभीर गुन्हयातील सर्व आरोपींना ताब्यात घेतले.**

**पोलीसांनी सदर प्रकरणात कलम १०९, ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करून आरोपी नामे १) सोहम पंजाबराव खंडारे, वय २० वर्ष २) प्रांजल सुरेश खंडारे, वय १९ वर्ष, दोन्ही रा. पंचशील नगर, वार्ड क्र. ०५, ईसासनी रोड, नागपूर ०३) भूमेश मंगेश लांडगे, वय २६ वर्ष, रा. वार्ड नं ०२, अमर नगर, पाणी टाकी जवळ, जि. प्र शाळा हिंगणा रोड नागपूर यांना तात्काळ ताब्यात घेत दिनांक १५/०५/२०२६ रोजी अटक केली.**

# अल्पवयीन बालीकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

पो.स्टे. काटोल :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. ५८९/२०२१ कलम ३६३, ३५४, ३५४ अ, (१), (i), ३७६ (एबी), सहकलम ४, ८ पोक्सो सहकलम अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(१), (डब्ल्यु), ३(२) (५), ३(२) (५) कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १६/११/२०२१ रोजी यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय ०६ वर्ष, मुलगा वय १० वर्षे यांना यातील **आरोपी नामे संजय रामकृष्ण बुटे, वय ४१ वर्ष, रा. सायखेडा, ता. सौसर, जि. छिंदवाडा मध्यप्रदेश** याने नविन कपडे घेवुन देतो या बहाण्याने येरंडा येथुन काटोलला फुस लावुन पळवुन नेले. मुलांना कपडे घेवुन दिले. त्यानंतर आणि सिंदी शिवारातील शेतातजवळ गाडी थांबवुन पिडीतेच्या भावाला गाडी जवळ थांबवुन पिडीतेला शेतात नेवुन पिडीतेवर लैंगिक अत्याचार केला.

श्री नागेश जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक १६/०५/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं १४, श्री जहीर अब्बाश शेख यांनी नमुद आरोपी नामे संजय रामकृष्ण बुटे, वय ४१ वर्ष, रा. सायखेडा, ता. सौसर, जि. छिंदवाडा मध्यप्रदेश यास कलम ८ पोक्सो अन्वये ५ वर्ष सश्रम कारावास व १०,००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास २ महीने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. कलम ३६३ भादवि अन्वये ५ वर्ष सश्रम कारावास व १०,००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास २ महीने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री एल. बी. शेंदरे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावनी दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. रणजित शिरसाठ प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल ,पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत

नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार पोहवा बाबा नेवारे ब. नं. ८२ नेमणुक पोलीस स्टेशन काटोल यांनी मदत केली आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ३० लाख ४५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक १५/०५/२०२६ रोजी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे उमरेड उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी पोस्टे पाचगाव हद्दीतील मौजा चांपा शिवार टोलनाका येथे नाकाबंदी केली असता टाटा सिंग्रा कंपनीचा १२ चक्का क्र. एम एच १२ डब्ल्यु जे ८४०१ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्परचा चालक नामे संजय शामराव ईश्वरकर, रा. मानव नगर, खरबी नागपूर हा पोलीसांना पाहुन टिप्परची चावी काढून पळुन गेला.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद १२ चक्का क्र. एम एच १२ डब्ल्यु जे ८४०१ किंमती ३०,००,०००/—रूपये २) ०९ ब्रास रेती किंमती ४५,०००/— रूपये असा एकुण ३०,४५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी विरूध्द पोस्टे पाचगाव येथे कलम ३०३(२), ४९, भा.न्या.सं. अधिनियम सहकलम ४८(७), (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधिनियम व सहकलम १५ पर्यावरण अधी सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक १५/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत कळमेश्वर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी साहील विनोद दुपारे, वय २४ वर्ष, रा. मरडवार ले आउट, कळमेश्वर, ह मु. लोणारा हा मरवड ले आउट कळमेश्वर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत मौजा काशी मोक्षधाम पारशिवनी येथे आरोपी १) प्रशांत राजेश शरणागत, वय २१ वर्ष, रा. प्रभाग क्र. १२ खारी पारशिवनी, त. पारशिवनी जि.नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **तसेच** मौजा रंगारी हॉटेलच्या मागे पारशिवनी येथे आरोपी २) मनोहर नत्थुजी डोकरीमारे, वय ६४ वर्षे, रा. वार्ड नं. ११, पारशिवनी हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आरोपी ३) यादव धोंडबाजी रंगारी, वय ५१ वर्षे, रा. वार्ड नं. १७, पारशिवनी हा मौजा ग्रामिण रूग्णालय पारशिवनी येथे सार्वजनीक जागेत अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. आरोपी ४) मोरेश्वर आनंदराव रेवतकर, वय ६१ वर्षे, रा. प्रभाग क्रं. ९, पारशिवनी हा मौजा पंचायत समिती गोडावुन मागे पारशिवनी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत कावरापेठ येथे आरोपी अमन सुधिर भावे, वय २९ वर्ष, रा. कावरापेट हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पाचगाव** अंतर्गत मौजा मटकाझरी तलाव येथे आरोपी १) आतिश ज्ञानेश्वर पोड, वय ४५ वर्षे, रा. आशिर्वाद नगर, हुडकेश्वर रोड, नागपुर २) संजीव डमरूधर बेहरा, वय ४७ वर्षे, रा. न्यु म्हाळगीनगर, पावर हाउसच्या मागे, नागपुर ३) ललीत सदानंद बाचेलकर, वय ३२ वर्षे, रा. आशिर्वाद नगर, हुडकेश्वर रोड, नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७४१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १६/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७४१ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे  ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १० आरोपी अशा एकुण १४९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १५  आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १२ आरोपी अशा एकुण ५७  रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २२ आरोपी अशा एकुण  १४२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ७४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १५ गुन्हे नोंद

दिनांक १५/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ६२४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे धनराज शिवाजी झाडे, वय ७० वर्ष, राह. कोहळी वार्ड नं.२, ता.कळमेश्वर, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) अमोल चिंतामण पुडके, वय २८ वर्ष, रा. कोच्छी, ता. सावनेर, जि. नागपूर २) विनायक श्रीराम नेवारे, वय ६० वर्ष, रा. शिवाजी नगर, घरकुल कॉलनी खापा, ता. सावनेर, जि. नागपुर ३) अरुण मोहन जांगडे, वय ६८ वर्ष, रा. प्रभाक क्र. ०४, बाजारचौक खापा, ता. सावनेर, जि. नागपुर याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे १) किशोर उध्दव वासनीक, वय ३६ वर्षे, रा. कढोली, ता. कामठी, नागपूर २) रोहीत पुरुषोत्तम वाढवे, वय ३० वर्षे, रा. वार्ड क्र. ०३, वडोदा, ता. कामठी, नागपूर याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी विशाल उर्फ टेकचंद नत्थुलालजी जैस्वाल, वय ६५ वर्ष, रा. तितुर, ता. कुही, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी क्र. १) नामे सुबोध भगवान घरडे, वय ३४ वर्ष, रा.नागतरोली, ता. भिवापुर, जिल्हा नागपुर २) परमविर वासुदेव शंभरकर, वय ३६ वर्ष, रा. टेकाळी, ता. पवनी, जिल्हा भंडारा ३) तानाजी वासुदेव मेश्राम, वय ४९ वर्ष, रा. चिखलगाव, ता. नागभीड, जिल्हा चंद्रपुर ४)` सुमेंध भंगवान घरडे, वय ३६ वर्ष, रा. नागतरोली, ता. भिवापुर, जिल्हा चंद्रपुर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे सुरेश शेषरावजी थोटे, वय ३३ वर्ष, रा. तुरकमारी सातगाव याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे रविन्द्र भिमरावजी दहेकर, वय ४९ वर्ष, रा. उमठा, ता. नरखेड, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) सिताराम सुरेश पाटील, वय २८ वर्ष, रा. शेमडा, ता.

नरखेड २) बबलु रामकिशन बंदे, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. १७, नरखेड ता. नरखेड याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १) २८ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ५९४० मिली देशी दारू असा एकुण ६२४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने